मे. ओ.एफ.बी. टेक लि. प्लॉट क्र. ब६, ब७, ब८, ब९ व ब१०, एम.आय.डी.सी. भालेर, ता. जि. नंदुरबार येथे प्रस्तावीत "किटकनाशके (फॉर्म्युलेशन वगळून) व कृत्रीम सेंद्रिय रसायने यांची निर्मिती" प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा इतिवृत्तांत :

.....

मे. ओ.एफ.बी. टेक लि. प्लॉट क्र. ब६, ब७, ब८, ब९ व ब१०, एम.आय.डी.सी. भालेर, ता. जि. नंदुरबार येथे प्रस्तावीत "किटकनाशके (फॉर्म्युलेशन वगळून) व कृत्रीम सेंद्रिय रसायने यांची निर्मिती" प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी मा. उप विभागीय अधिकारी, नंदुरबार भाग जि. नंदुरबार यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश दि. १२/०८/२०२६ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर जाहीर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१.	मा. उप विभागीय अधिकारी, नंदुरबार भाग नंदुरबार, जि. नंदुरबार	अध्यक्ष
२.	मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक	सदस्य
३.	उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे	समन्वयक

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळ धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन लोकसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ. १५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी, जि. नंदुरबार यांच्या मान्यतेने दि. ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सदर लोकसुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले.

सदर जाहीर लोकसुनावणी बाबतची जाहीर सुचना दि. ३०/०७/२०२६ रोजी दै. लोकमत (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, धुळे येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवाल व सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
- जिल्हा परिषद, नंदुरबार
- जिल्हा उदयोग केंद्र, नंदुरबार
- उपविभागीय कार्यालय, नंदुरबार जि. नंदुरबार
- तहसिल कार्यालय, नंदुरबार जि. नंदुरबार
- ग्रामपंचायत कार्यालय, भालेर, अक्राळे, उमरडे ख., धामदोड, कलमाडी, कानल्डे, शिंदगव्हाण, काकर्डे, होळ टी. रानाळे, वादबरे, ता. व जि. नंदुरबार
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, धुळे.
- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नाशिक
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, (मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पाबाबत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ धुळे यांचेकडे सद्य:स्थितीत सदर ईमेलव्दारे एक सुचना प्राप्त झालेली आहे. सदर उद्योगाबाबत कोणास काही लेखी / तोंडी आक्षेप, टिका – टिपणी, सुचना नोंदवायचे असतील तर ते सदर लोकसुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोकसुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली. तसेच कोणाला प्रकल्प अथवा सुनावणी बद्दल काही आक्षेप, टिका – टिपणी, सुचना असतील तर ते आपण सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर मांडू शकतात असे सांगण्यात आले.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रवर्तक व पर्यावरणीय सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर लोकसुनावणी प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक - आर्थिक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक - आर्थिक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्पाचे प्रवर्तक व पर्यावरणीय/तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी मांडलेल्या सूचना / आक्षेप इत्यादींचा वृत्तांत खालीलप्रमाणे.

अ. क्रं.	टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिंचे नाव व पत्ता	लोकसुनावणी समिती / उद्योगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन/ उत्तर
१.	श्री. जगन्नाथ टोंगल पाटील, (माजी सरपंच) रा. भालेर, ता. व जि. नंदुरबार यांनी मुद्या उपस्थित केला की —	उद्योगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की,
	आम्हाला आज लोकसुनावणीदरम्यान सादर केलेल्या सादरीकरणाची (Presentation) प्रत मिळावी. सादरीकरण करणे व त्यात नमुद केलेल्या बाबी कार्यान्वीत करणे याबाबत आम्हास प्रकल्प प्रवर्तकाने आश्वासन व लेखी हमी द्यावी.	लोकसुनावणी दरम्यान सादर केलेल्या सादरीकरणाची (Presentation) प्रत आपणास देण्यात येईल. तसेच सादरीकरणात नमुद केलेल्या बाबी यांची अंमलबजावणी करण्यात येईल.
	उद्योगाचे बांधकाम करतांना ठेकेदाराने स्थानिक मजुरांना प्राधान्य द्यावे. तसेच रोजगाराची गावाशी बांधिलकी आवश्यक आहे.	सदर उद्योगात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. प्रॉडक्ट (उत्पादने) पॅकींग करण्यासाठी महीलांना प्राधान्याने रोजगार देण्यात येणार आहे.
	सादरीकरणात नमुद केलेल्या घातक कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत हमी आवश्यक आहेत. आमचा प्रकल्पाला विरोध नसुन प्रकल्पाचे स्वागत आहे. परंतु सदर प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. आज या जागेची हवेची गुणवत्ता (Air Quality) उत्तम आहे. सदर उद्योगामुळे हवेची गुणवत्ता खराब होवू नये.	
	सदर उद्योगाचे बांधकामास किती वर्ष लागणार आहेत ?	उद्योगाचे बांधकाम हे ३ ते ४ वर्ष चालेल.
	सामाजिक सर्वेक्षण हे डिसेंबर ते फेब्रुवारी या	भालेर गावाचे सर्वेक्षण करण्यात

	कालावधी मध्ये केले. आपल्या सादरीकरणात वडवद व उमर्डे या गावांची माहिती देण्यात आली आहे. परंतु भालेर गाव जिथे एम.आय.डी.सी. असून त्या गावाचे सामाजिक सर्वेक्षण केलेले नाही.	आलेले असून त्याबाबतची माहिती पर्यावरण मुल्यांकन अहवाल (EIA Report) या मध्ये नमुद केलेली आहे.
	तसेच उद्योग किती शिफ्ट (पाळी) मध्ये चालविला जाणार आहे. उद्योग १००% सुरू झाल्यावर किती पदवीधर लोकांना रोजगार देण्यात येईल. रोजगारामध्ये सर्वात आधी स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. कारण रोजगाराव्दारे आपली गावाशी बांधिलकी जपली जाणार आहे. कंपनी उत्पादन करेल, नफा कमवेल, शासनास महसूल मिळेल परंतू येथे स्थानिकांना प्राधान्य मिळावे.	सदर उद्योग हा तीन (३) शिफ्ट मध्ये चालविण्यात येईल व साधारणत: ७०० कुशल कामगार व ३०० अकुशल कामगार यांना रोजगार देण्यात येईल.
	या उद्योगामध्ये घातक कचरा व दुषित पाणी यांचे व्यवस्थापन कसे केले जाणार आहे? दुषित पाणी सोडल्यास विहीर, नैसर्गिक नाले, भुगर्भातील पाणी खराब होईल व त्यामुळे पिण्याचे पाणी व शेतीला धोका निर्माण होईल. सदर उद्योगामुळे हवा व पाणी प्रदुषण होणार नाही व आज जशी शुध्द हवा आहे तशीच ती भविष्यात सुध्दा शुध्द रहावी अशी उद्योगाने आम्हाला किंवा ग्रामपंचायतीस लेखी हमी द्यावी.	**पर्यावरणीय लोकसुनावणीचे अध्यक्ष यांनी नमुद केले की** — आपण मांडलेले सर्व मुद्दे यांचे व्हिडीयो रेकॉर्डींग (Video Recording) होत असून व याची इतिवृत्त नोंद घेण्यात येवून शासनाला अहवाल पाठविला जाईल. **उद्योगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की** - निर्माण होणाऱ्या दुषित पाण्यावर प्रक्रिया करणारी सनियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. सदर प्रकल्प हा Zero Liquid Discharge (ZLD) हया श्रेणीतला असून यामुळे पाण्याचा एकही थेंब उद्योगाच्या जागेबाहेर सोडला जाणार नाही. तसेच

		प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नरवापर करण्यात येईल. त्यामुळे ताजे पाणी ही कमी प्रमाणात लागेल व पर्यावरणास फायदा होईल. तसेच सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (STP - Sewage Treatment Plant) बसविण्यात येईल. प्रकिया केलेले पाणी हे झाडांना व बगिचा मध्ये वापरण्यात येईल. तसेच, घातक कचरा हा शासन मान्य प्रक्रिया केंद्राकडे पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात येईल. सादरीकरणात दाखविलेल्या सर्व बाबी/प्रदुषण सनियंत्रण यंत्रणा यात उभारल्या जातील. तसेच शासनाच्या सर्व अटी/शर्तीचे मानके यांचे पालन केले जाईल. या बाबतचे सदर पत्र ग्रामपंचायत यांना देण्यात येईल.
	सदर उद्योगाला किती पाणी लागेल?	उद्योगाला ७०० किलो लिटर प्रतिदिन इतके पाणी रोज लागणार आहे. तसेच प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सुध्दा पुर्नवापर करण्यात येईल.
	उद्योगाच्या पायाभरणीवेळीच झाडे लावावी. जेणेकरून उद्योगसुरू होण्यावेळेस झाडे मोठी झालेली असतील.	आम्ही उद्योग उभारणीच्या वेळी झाडे लावू. झाडे लावण्यासाठी आम्ही निधीची व्यवस्था केलेली आहे. या प्रकल्पात ५ वर्षात ३ टप्यांमध्ये एकूण १२०० वृक्ष लावण्यात येतील.
	सदर उद्योगामध्ये झाडे कुठे लावण्यात येतील याबाबत माहिती विचारली.	प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार यांनी लेआऊट प्लॅन (Lay out plan) दाखविला व त्यामधील हिरव्या रंगाने

		दर्शविलेल्या भागामध्ये वृक्षारोपण करण्यात येईल असे नमुद केले.
२.	श्री. संजीव कैलास बागुल – रा. भालेर, ता. व जि. नंदुरबार यांनी मुद्दा उपस्थित केला की – येथे फक्त रासायनिक कंपनीला परवानगी देवू नये. येथे रासायनिक उद्योगांचा समुह तयार होऊ नये. समुह तयार झाल्यास प्रत्येक उद्योगातील प्रदुषणामुळे एकत्रित पर्यावरण खराब होईल. येथे कपडे, हिरे यावर आधारित उद्योंगाना प्राधान्य द्यावे. यापुढे येथे रासायनिक उद्योगांना परवानगी देवू नये. माझी उप विभागीय अधिकारी यांना विनंती आहे की, साहेबांनी याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, (धुळे) यांच्याशी चर्चा करावी.	---
३.	श्री. भरत गुलाबराव पाटील, रा. भालेर, ता. व जि. नंदुरबार यांनी मुददा उपस्थित केला की - या पंचक्रोशीत सर्वप्रथम मी रेशीम शेती करणार आहे व मी ती पुढच्या ६ महिन्यात सुरू करणार आहे. माझ्या शेतीचे अंतर ५०० मीटर आहे. सदर उद्योगातून निर्माण होणाऱ्या हवेच्या प्रदूषणामुळे माझी रेशीम शेती खराब होणार नाही याची आपण शाश्वती व लेखी हमी दयावी.	उद्योगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की - हवा प्रदूषण नियंत्रणासाठी Electro Static precipitator (ESP), वेट स्क्रबर, गॅस मॉनेटरींग सिस्टींम, बसविण्यात येणार आहे. तसेच लाईट गेली असता जनरेटर (DG Set) लावण्यात येईल. शासनाने निर्गमीत केलेल्या सर्व अटी/ शर्ती/ तरतुदींची अंमलबजावणी करण्यात येईल.
४.	श्री. चंद्रशेखर भास्कर पाटील, रा. भालेर, ता. व जि. नंदुरबार यांनी मुददा उपस्थित केला की – सदर उद्योगाकडून ग्रामपंचायतला एक हमी पत्र देण्यास हरकत नसावी. सदर उद्योगात वापरण्यात येणाऱ्या कोळसा (Fly ash) चा निघणाऱ्या धुर राखेचे आपण काय नियोजन करणार आहात?	उद्योगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की - सदर कोळसा हवा प्रदुषणासाठी Electro Static precipitator (ESP) इ.एस.पी. ही हवा प्रदूषण सनियंत्रण प्रणाली बसविण्यात येईल. तसेच निर्माण होणारी राख विट बनविणाऱ्यांना देण्यात येईल.

	सदर उद्योगासाठी लागणाऱ्या कोळसा हा जर स्थानिक गावात उपलब्ध असेल तर तो घेण्यात यावा. तसेच कोळसा ची खरेदी व वाहतुक यामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे.	जर स्थानिक गावात कोळसा उपलब्ध होत असेल तर आम्ही नक्की घेवू कारण आमचा वाहतुकीचा खर्च वाचेल.
५.	श्री. योगेश संजय पाटील, रा. भालेर, ता. व जि. नंदुरबार यांनी मुद्या उपस्थित केला की - सदर उद्योगात रोजगाराची संधी उपलब्ध करून देतांना कुठल्याही प्रकारची ओळख किंवा पक्षपात (Partiality) याद्वारे देवू नये. सदरील व्यक्तीचे शिक्षण व कौशल्य पाहून भरती करण्यात यावी. तसेच भरती प्रक्रिया पुर्णत: पारदर्शक पणे राबविण्यात यावी.	उद्योगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की - सदर उद्योगाकरीता तांत्रिक / कुशल कामगार व अकुशल कामगार हे त्यांच्या पदवी, शिक्षण व कौशल्य यानुसार घेण्यात येतील. तसेच, भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येईल.
६.	श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, यांनी पुढील नमुद केलेले मुद्दे उपस्थित केले – "शाश्वत औद्योगिक विकासाला पाठिंबा देणारा मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे. सामान्यत: पर्यावरणवादी आणि स्वयंसेवी संस्था (NGOs) औद्योगिक विकासाच्या उपक्रमांना विरोध करतात. परंतु, मी मनापासून औद्योगिक उपक्रमांचे समर्थन करतो. माझ्या मते, 'बेरोजगारी' हे समाजासमोरील सर्वात मोठे प्रदूषण आहे. भारतात दरवर्षी साधारणपणे १ कोटी युवक बेरोजगार श्रेणीत प्रवेश करत आहेत. केंद्र आणि सर्व राज्य सरकारे मिळून केवळ ५ ते ६ लाख लोकांनाच नोकऱ्या देऊ शकत आहेत, तर उर्वरित ९५ लाख युवक औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून आहेत. सध्या १८ ते ३५ वयोगटातील ४० कोटी युवक चांगल्या रोजगाराच्या संधींची वाट पाहत आहेत आणि राज्यामध्ये औद्योगिक विकासाची अत्यंत तातडीची गरज आहे. पर्यावरणवादी आणि स्वयंसेवी संस्था	समन्वयक यांनी नमुद केले की - आपण ई-मेल व्दारे दिलेल्या सुचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृत्तात समावेश केला जाईल. या व्यतिरिक्त आपल्या अजून काही सुचना असल्या मांडाव्या जेणेकरून त्यांची इतिवृत्तात नोंद घेता येईल.

	औद्योगिक विकासामुळे सार्वजनिक आरोग्य ढासळत असल्याचा आरोप करत आहेत. भारतातील केवळ १५% लोकसंख्या ही औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात राहते. त्यामुळे आरोग्याला होणाऱ्या धोक्यांसाठी केवळ उद्योगांनाच जबाबदार धरणे योग्य नाही. उर्वरित ८५% लोकसंख्या ही औद्योगिक प्रदूषणाच्या प्रभावाशिवाय देखील अनेक आरोग्य समस्यांना तोंड देत आहे. म्हणूनच, पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच औद्योगिक विकासाच्या गरजेकडे लक्ष देण्याची हीच योग्य वेळ आहे." उद्योगाच्या आवारात झाडे लावतांना फळे व औषधी वनस्पती यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. उद्योगाने आपल्या जागेत पावसाच्या पाण्याची साठवण (Rain Water Harvesting) याचा वापर करावा. स्थानिक नागरिकांशी रोजगार व इतर बाबींकरीता समन्वय समितीची स्थापना करावी. मी प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार यांचे अभिनंदन करतो. तसेच केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, मंत्रालय, भारत सरकार यांना विनंती करतो की सदर प्रकल्पास आपण पर्यावरण संमती (Environment Clearance) देण्यात यावी.	
७.	श्रीमती. अश्विनी महाजन, रा. चौपाळे, ता. व जि. नंदुरबार यांनी मुद्दा उपस्थित केला की - सद्य:स्थितीत शेतात मजुरीची कामे मिळत नाही. आपण भालेर गावातील महिलांसोबत आमच्या चौपाळे गावातील महिलांना सुध्दा रोजगार द्यावा ही विनंती. तसेच रोजगारासोबत महिलांना कंपनीत येणे व जाण्यासाठी	उद्योगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की - प्रॉडक्ट (उत्पादन) पॅकींग करण्यासाठीची कामे महिलांनाच देणार आहोत. तसेच कामा बाबतचे प्रशिक्षण (Training) सुध्दा देण्यात येईल.

	वाहतुकीची सुध्दा व्यवस्था उपलब्ध करावी.	

सदर जाहीर लोकसुनावणीचे मा. अध्यक्ष, यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. तसेच, सदर लोकसुनावणीचा मुख्य उद्देश लोकांचे म्हणणे दाखल करून घेणे व त्याबाबतची माहिती शासनास कळवावी. सदर उद्योगास प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा बसविणे, शासनाने निर्गमित केलेले अटी/शर्ती/नियम व त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी रोजगारात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे.

लोकसुनावणीचे समन्वयक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश लोकसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल, तद्नंतर समन्वयक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने उपस्थित नागरिकांचे आभार मानुन लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

सदर पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी पुर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, धुळे या कार्यालयास ई-मेल व्दारे एक (०१) सूचना/आक्षेप व लोकसुनावणी दरम्यान एक (०१) सूचना/आक्षेप असे एकूण दोन (०२) सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या असून सोबत जोडलेल्या आहेत.

(प्रणव पाखले)	**(विद्यासागर वि. किल्लेदार)**	**(बंडु कापसे)**
समन्वयक	सदस्य	अध्यक्ष
तथा उप प्रादेशिक अधिकारी,	तथा प्रादेशिक अधिकारी,	तथा उप विभागीय अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, धुळे	म.प्र.नि. मंडळ, नाशिक	नंदुरबार भाग, जि. नंदुरबार

RANGARAO KOTHAKONDA
GENERAL SECRETARY
CONTACT NO. 73866 37187

SAVE EARTH

Metro Urban & Rural Development Society

Regd No. 17/2020
Hs no. 100, Rd No. 5, Phase 2, Chaithanyanagar Colony, BN Reddy Nagar, Saroor Nagar, Rangareddy Dist. Telangana- 70

To,
The District Environmental Engineer,
Maharashtra Pollution Control Board,
Sub Regional office Dhule.

Date; 02 - 09 - 2026

Sub: Environmental clearance issue to the M/s. O F B Tech Limited. has proposed to Agro Chemicals and Organic Chemicals manufacturing Unit establishment proposal total manufacturing production capacity 6,63,643.2 TPA (excluding pesticides formulation products 78,600 TPA and By-products 5,85,043.2 TPA) located in plot No: B6, B7, B8, B9 & B10, at MIDC Bhaler "Village", Nandurbar " Taluka & District", Maharashtra state.

Request: Sir Iam K. RANGARAO Iam Environmental social worker and Central Government certified yoga guruvu. Iam supporting to the M/s. O F B Tech Limited. Proposal of Agro Chemicals and Organic Chemicals manufacturing Unit establishment proposal because this type of projects or generating revenue for the state Government, local employment and Businesses opportunities. my opinion is about to unemployment is the major Pollution in our country, 18 to 35 age group youth are waiting for better employment opportunities there is on urgent need for industrial development in the state Iam requesting the public hearing panel committee to recommend the MOEF & CC to give the unconditional permission to this industry at the same time Iam suggesting few things to the it management.

<u>The Suggestions:</u>

1, Your consultant as already conducted base line survey of air,water,land are very good. My Request is collect the crop production status & ground water availability and health status Of the people & conduct Health and Immunity development awareness programs. Construct Water Harvesting structures & storage rain water & develop ground water levels this area.

2,My request please Take up village plantation nearby villages & also avenue plantation for Internal roads, give priority to fruit baring and medicinal value plants.

3, Please Promote Skill Development training to unemployed youth, give top priority to the local Educated unemployed youth to give Employment.

4, CSR Funds should go through the village committees for developments to the effected Villages and support Rural primary education for weaker sections.

Thanking You Sir

Yours obediently,

Sunga Rao.K

(RANGARAO KOTHAKONDA)

दि. 2/09/2026
वार- बुधवार

प्रति -
मा. जिल्हाधिकारी साहेब
नंदुरबार

विषय :- मे. ओ.एम.सी. टेक लि. प्लॉट ब 6, ब)
ब8, ब9 व ब10 एम.आय.डी.सी. अक्कलकुवा
ता.जि. नंदुरबार येथे "किटकनाशके
(कॉम्प्युलेशन करणे) व कृत्रिम सेंद्रिय
रसायने यांची निर्मिती" प्रकल्पाच्या
प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक मंजूरी
करिता लोक सुनावणी होणेबाबत करणत
येणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सविनय सादर करण्यात येते कि, वरील एम.आय.डी.सी अंतर्गत येणाऱ्या पहिल्या उद्योगाचे मी मनापासून स्वागत करतो. हे स्वागत करत असतांना एक कर्तव्यदक्ष नागरिक व याठी उपसरपंच म्हणून ग्रामपंचायत काही मुद्द्यांवर लक्ष देणे आहे.

1) प्रस्तावित उद्योग प्रकल्पाचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणात 2 कि.मी. मध्ये वडवद व 3 गावांचा समावेश करण्यात आला आहे. परंतु गावाचा समावेश करण्यात आलेला नाही.

2) प्रस्तावित प्रकल्पात किती रोजगार निर्मिती होईल हे नमूद करण्यात आले आहे साधारण 1025 कुशल - अकुशल रोजगार निर्मिती होणार आहे परंतु मात्र त्यात किती स्थानिक

उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, धुळे

निवेदनात नमूद मुद्दा बाबत उचित कार्यवाही करावी.

02.09.2026
उप विभागीय अधिकारी,
नंदुरबार.

रोजगारांना संधी निर्माण झाली आहे त्यांची हमी देण्यात आली नाही.

3) घनकचरा व दुषित पाणी व्यवस्थापनाच्या कामी आराखडा देण्यात यावा.

4) पर्यावरण व्यवस्थापन व उन्नतीकरण यंत्रणेच्या कामी आराखडा देण्यात यावा

5) स्थानिक उत्पादनाच्या युनिटच्या कामी आराखडा देण्यात यावा.

इ. हरकती मी होत आहे.

या हरकतींचा विचार करून माझा या हरकती बाबत योग्य तो लेखी खुलासा देण्यात यावा.

आपला विश्वासू

श्री. जगन्नाथ तोंगल पाटील
मा. उपसरपंच ग्रा.प.
आलेर
मो.नं. 9767465873